# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र. २४०१०४३७/२४०२०७८१
फॅक्स क्र. २४०४०६१२
Website: http//mpcb.gov.in
E-mail: eb@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, दुसरा मजला,
सायन माटुंगा स्किम रोड नं.८,
सिने प्लॅनेट समोर, सायन (पूर्व),
मुंबई: ४०० ०२२.

जा.क्र.मप्रनि/आस्था/ब- 368

दिनांक : 31/3/२०१६

## परिपत्रक

**विषय: मा. उच्च न्यायालय तसेच मा. राष्ट्रीय हरित लवाद (NGT) येथे मंडळाबाबत विविध प्रकरणामध्ये देण्यात येणाऱ्या आदेशाबाबत. . .**

**संदर्भ:१.मप्रनि मंडळाचे परिपत्रक क्र.मप्रनिमं/सस/४०, दिनांक २५/८/२०१५**
**२.मप्रनि मंडळाचे परिपत्रक क्र.बीओ/पीएण्डएल डिव्हीजन/३०९, दि.१९/१/२०१६**

---------------

मंडळाशी संबंधित अनेक न्यायविषयक प्रकरणे मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर, औरंगाबाद व मा. हरित लवाद, पुणे येथे प्रलंबित आहेत. माझ्या असे निदर्शनास आले आहे की, विविध प्रकरणामध्ये सदर न्यायालयांनी मंडळाविरुध्द ताशेरे दिले आहेत व यास मंडळ स्तरावर होणारा विलंब जबाबदार आहे. या संदर्भात उपरोक्त परिपत्रकांनुसार तसेच विविध परिपत्रकांनुसार व कार्यालयीन आदेशांनुसार सदर बाब संबंधिताच्या निदर्शनास आणुन देण्यात आली असून, विहित वेळेआधी प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु मंडळातील प्रादेशिक अधिकारी/उप-प्रादेशिक अधिकारी यांच्याकडून माहिती विहित वेळेत सादर न होणे अथवा अचूक माहिती सादर न होणे तसेच न्यायालयांच्या आदेशांची पूर्तता न करणे या कारणांस्तव प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करण्यास विलंब होत आहे.

मंडळातील अधिकारी बऱ्याचवेळा प्रतिज्ञापत्र (Affidavit) सुनावणीच्या दिनांकाच्या एक दिवस आधी स्वाक्षरीसाठी /मान्यतेसाठी माझ्याकडे सादर करतात. सदर Affidavit बऱ्याचवेळा अपूर्ण अथवा व्यवस्थितपणे केलेली नसतात. तसेच मोघम स्वरुपाचे शेरे सादर केलेले असतात. या संदर्भात देखील मुख्यालयाकडून वेळोवेळी योग्य माहिती सादर करणेबाबत संबंधितांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु मंडळातील अधिकारी जाणुनबुजून या बाबींकडे दुर्लक्ष करीत आहेत. तसेच मंडळाने नेमणूक केलेले Panel Advocate यांना देखील प्रादेशिक अधिकारी / उप-प्रादेशिक अधिकारी यांच्याकडून सहकार्य प्राप्त होत नाही. परिणामी काही प्रकरणी सदस्य सचिव यांना स्वत: न्यायालयात उपस्थित रहावे लागत आहे.

झालेल्या विलंबाबाबत अथवा कामकाजातील हलगर्जीपणाबाबत मंडळातर्फे देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसला देखील संबंधित अधिकारी विहित कालावधीत उत्तरे देत नाहीत व याबाबतची दखल विधी शाखा अथवा विभागप्रमुख स्तरावर होत नाही. यामुळे मा. हरित लवाद न्यायालयाच्या स्तरावर मंडळाविरुध्द आदेश झाल्याचे आढळते. ही बाब अतिशय गंभीर आहे व मंडळातील अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत संभ्रम निर्माण करणारी आहे.

तरी, सर्व विभाग समन्वयक/प्रादेशिक अधिकारी /उप-प्रादेशिक अधिकारी यांनी मे.राष्ट्रीय हरीत लवादाने विविध प्रकरणांमध्ये जारी करीत असलेल्या आदेशांचा पाठपुरावा खालीलप्रमाणे करावा.

१. सर्व प्रादेशिक अधिकारी/ उप-प्रादेशिक अधिकारी यांनी मे.राष्ट्रीय हरीत लवाद यांच्या संकेतस्थळावर जाऊन, दररोज Cause List बघावी व त्यांच्या अखत्यारितील प्रकरणांमध्ये सुनावणीच्या दिवशी, मे.राष्ट्रीय हरीत लवादासमोर हजर रहावे.

२. सर्व प्रादेशिक अधिकारी / उप-प्रादेशिक अधिकारी यांनी मे.राष्ट्रीय हरीत लवादासमोर दाखल झालेले अपिल्स/अर्ज प्राप्त झाल्यानंतर, योग्य ती शहानिशा करुन, त्यांच्या अखत्यारितील संबंधीत प्रकरणांमध्ये सद्यस्थिती अहवाल, पृथ:करण अहवाल मंडळाने नेमणुक केलेल्या Panel Advocates मार्फत प्रतिज्ञापत्राद्वारे मे.राष्ट्रीय हरीत लवादासमोर दाखल करावा.

३. महत्वाच्या व धोरणविषयक प्रकरणांमध्ये विभाग समन्वयक (Area Co-Ordinator) व विभाग प्रमुख यांनी विधी व योजना विभागाच्या सल्ल्याने प्रारुप प्रतिज्ञापत्र तयार करावे व सदस्य सचिव यांच्या मान्यतेने विभाग समन्वयक यांनी विभाग प्रमुखाशी समन्वय साधून मे.राष्ट्रीय हरीत लवादासमोर विहित वेळेमध्ये अंतीम प्रतिज्ञापत्र दाखल करावे. तसेच धोरणविषयक व महत्वाच्या प्रकरणांमध्ये विभाग समन्वयकाने मे.राष्ट्रीय हरीत लवादासमोर सुनावणीच्या दिवशी आवश्यकता असल्यास हजर रहावे.

सदर परिपत्रकाद्वारे आपणा सर्वांना सुचित करण्यात येते की, अशाप्रकारच्या कार्यालयीन कामकाजातील हलगर्जीपणाबाबतच्या नोंदी आपल्या गोपनीय अहवालात घेण्यात येतील. मे.उच्च न्यायालय/ हरित लवाद यांनी दिलेल्या आदेशांचे प्रादेशिक अधिकारी/उप-प्रादेशिक अधिकारी यांनी पालन न केल्यास, सदर बाबतचा प्रस्ताव विभाग समन्यवय यांनी विधी शाखेद्वारे, पुढील कार्यवाहीकरिता मा.सदस्य सचिव यांचेसमोर सादर करावा.

**(डॉ.पी.अनूबलगन,भा.प्र.से.)**
सदस्य सचिव

**प्रतमाहितीसाठी,**

१. **सहसंचालक-हप्रनि/ प्रधानवैज्ञानिकअधिकारी /सहसंचालक-जप्रनि/ सहा.सचिव(तां)**,म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
२. **मुख्यलेखाअधिकारी**,म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
३. **विधीअधिकारी** -मुख्यालय / विधीशाखा, म.प्र.नि.मंडळ, मुंबई..
४. **वरिष्ठप्रशासकीयअधिकारी/लेखाअधिकारी(आस्थापना)**,म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
५. **प्रादेशिकअधिकारी**,मुख्यालय/मुंबई/ठाणे/कल्याण/नवीमुंबई/रायगड/पुणे/कोल्हापूर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/ नागपूर/ चंद्रपूर.
६. **उपप्रादेशिकअधिकारी**-मुख्यालय / मुंबई - १/ २/ ३/ ४/ ठाणे - १/ २/ तारापूर - १/ २/ कल्याण - १/ २/ ३/ नवीमुंबई-१/ २/ ३/तळोजा/रायगड-१/२/ रोहा/महाड/पुणे-१/ २/ पिंपरीचिंचवड/सातारा/ सोलापूर/ कोल्हापूर/ सांगली/ चिपळूण/ रत्नागिरी/ नाशिक/जळगांव-१/ २/ अहमदनगर/औरंगाबाद - १/ २/ ३/ नांदेड/परभणी/लातुर/अमरावती- १/ २/ अकोला/नागपूर- १/ २/ ३/ चंद्रपूर/भंडारा.
७. सहाय्यक यंत्रणा अधिकारी, पर्यावरण माहिती केंद्र, मप्रनि मंडळ, मुंबई- त्यांना असे आदेश देण्यात येत आहे, सदरहू परिपत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात यावे.